# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- २०१९/तक्रार क्र. बीएम- १०५/०१**

**तक्रारकर्ता श्री. विकास दगडू हनवते**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता-१ (पश्चिम विभाग)**
मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई गृहनिर्माण भवन,
कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पश्चिम)**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, मुंबई गृहनिर्माण भवन,
कलानगर, बांद्रा (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १८.०६.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००४२७४ प्रकरणी आयोगाने दि.१७.१२.२०१८ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :-

*"जन माहिती अधिकाऱ्यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी दि. ०५.०१.२०२१ पर्यंत अपीलकर्ते आणतील त्या पेनड्राईव्हमध्ये माहिती कॉपी करुन अपिलार्थींना विनामुल्य द्यावी. या आदेशासह अपील मान्य करुन निकाली काढण्यात येत आहे."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १५.०२.२०२१ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगाने दि.१५.०४.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. जन माहिती अधिकारी यांनी दि.०६.०५.२०१९ रोजी अहवाल सादर केला की, अपिलार्थी यांनी शुल्क भरले नसल्याने माहिती देता येणे शक्य झाले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याव्दारे केलेली कार्यवाही उचित नाही. कारण मा. राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांचे आदेश होते की, अपिलार्थींना विनामुल्य माहिती द्यावी.

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे निवेदन दि. २९.०६.२०२४ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले की, अपिलार्थींना अभिलेखावर उपलब्ध वर्षनिहाय माहिती अपिलार्थींनी आणलेल्या पेनड्राईव्हमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश दि. १७.१२.२०१८ प्रमाणे तक्रारकर्ता यांना त्यांच्या कार्यालयात बोलवून उपलब्ध माहिती १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) अन्वये निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०२.०७.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**